# टेसेलेशनचे काही साधे नमुने

कोणत्याही आकाराचा वापर करून नवी नक्षी कशी तयार करायची आणि त्यातूनच गुंतागुंतीचे नमुने कसे बनवायचे त्याची काही साधी उदाहरणे आता पाहूया :



1. प्रथम एक चौकोन काढा.



2. त्या चौकोनाची एक बाजू कोणत्याही आकारात कापा.



3. कापलेला भाग चौकोनाच्या दुसऱ्या बाजूला लावा. आता तयार झालेल्या नव्या आकारात कसलेही चित्र काढा.



4. नवीन तयार झालेला आकार परत परत वापरून तुमची नक्षी तयार होईल. आणखी नवे नमुने आपल्या मनाने तयार करा.